# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. ३३२** **दिनांक २७/११/२०२१**

## मारहाण करुन जबरी चोरी करणा-या तिघांना अटक--वालीव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

वालीव पोलीस ठाण्याच्या कार्यकक्षेत रस्त्यावरील पादचा-यांना दुखापत करुन जबरी चोरी करण्याच्या घटना घडत असल्याने सदर घटनांचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी सदरील घटनांना आळा घालण्याचे दृष्टीने सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने सहाय्यक पोलीस आयुक्त व प्रभारी अधिकारी, वालीव पोलीस स्टेशन यांनी वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना घटनास्थळावरील बारकावे व तांत्रिक विश्लेषण दृष्टीकोनातून तपास करण्याबाबत सुचना व मार्गदर्शन केले होते.

तक्रारदार श्री. पियुष मोरेश्वर दळवी हे दिनांक 22 नोव्हेंबर 2021 रोजी रात्री 22:30 वाजताच्या सुमारास गोखिवरे गावातील भाटपाडा येथील गणपती मंदिराच्या लगत रात्रीचे जेवण आटपुन चालत असतांना चार अनोळखी ईसमांनी श्री. पियुष दळवी यांच्या हातातील आय फोन जबरीने हिसकावुन प्रतिकार करणारे श्री. पियुष दळवी यांना लाकडी दांडकयाने मारहाण केली होती. सदर घटनेच्या अनुषंगाने वालीव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक 1326/2021 भारतीय दंड संहितेच्या कलम 394, 34 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर प्रकरणी गुप्त बतामीदार तसेच तांत्रिक माहितीचे आधारे संशईतांचा शोध घेऊन वालीव पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटिकरण शाखेच्या अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीत 1) विरेंद्रकूमार लखन पासवान वय : 24 वर्षे रा. वसई पूर्व 2) आर्या मिथिलेश राज वय 23 वर्षे रा. वसई पूर्व आणि 3) अविनाश मिकी गूप्ता रा. गोखिवरे वसई पूर्व यांना अटक करून सदरचा गुन्हा उघडकीस आणून आरोपीतांकडुन 4000/- रुपये किंमतीचा आयफोन मोबाईल हस्तगत केला आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-2 वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, पोहवा. मुकेश पवार, मनोज मोरे, पो.ना. सचिन दोरकर, राजेंद्र फड, पो. अंम. गजानन गरीबे. सुर्यकांत मुंढे, जयवंत खंडवी यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

----000----